## प्रेसनोट

दि.२८/०६/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पारनेर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्रीमती. लता एकनाथ निकाळजे, वय-४२ वर्ष, धंदा- नोकरी, तलाठी वर्ग ३, नेमणूक- सजा- लोणी हवेली, अतिरिक्त पदभार सजा किन्ही, रा.दिघे यांचे घरी भाडयाने, पारनेर ता. पारनेर जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १,०००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी त्यांचे तिखोल गावातील आजोबा व वडील यांचे नांवे असलेली शेतजमीन वारसा हक्काने तक्रारदार त्यांची आजी, आई, भाऊ यांचे नांवे करुन त्याचे नावाची नोंद लावणेकरिता अर्ज दिला होता. सदरची नोंद लावणेकरिता आरोपी लोकसेविका लता एकनाथ निकाळजे, धंदा नोकरी, तलाठी, सजा लोणी हवेली, अतिरिक्त पदभार किन्ही, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांनी आरोपी लोकसेविका यांना १००० रुपये दिले, तरीही उर्वरित १०००/- रुपयेची लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर, यांचेकडे दिली. दिलेल्या तक्रारीवरुन दि.२८/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणीमध्ये आरोपी लोकसेविका यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेने आज रोजी आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेविका यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून १,०००/- रुपये लाचेची रक्कम तलाठी कार्यालय किन्ही येथे स्वीकारली असता आरोपी लोकसेविका लता एकनाथ निकाळजे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

२८/०६

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर

Scanned with CamScanner